

# माता आरोग्य हक्क कार्यक्रम
# 'गावगटा'साठी मार्गदर्शक पुस्तिका

**गावगट कशासाठी ?**

आपल्या गावातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व बालकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहेत. त्यासाठी ग्रामपंचायत व संबंधित सरकारी कर्मचारी / विभाग आणि लोक यांच्यासोबत समन्वय व सहकार्य करायला हवे. जिथे कमतरता आहेत त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. आपल्या गावातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना आरोग्य सेवा व आर्थिक लाभाच्या योजना मिळवून देण्यासाठी गावातील लोकांनी पुढाकार घ्यायला हवा. यासाठी आपल्याला गावात 'गावगट' स्थापन करायचा आहे.

**आता आपण 'गाव गट' म्हणजे काय ? ते समजून घेऊयात !**

मंडळी, आपल्या गावात 'गाव आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती' असेलच. शिवाय, गावात या समितीच्या जोडीला अंगणवाडी अंतर्गत अजून दोन समित्या आहेत. गावातील स्त्रिया व मुलांच्या पोषणाची आणि आरोग्याची काळजी घेणाऱ्या अंगणवाडीतील, 'डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजने' अंतर्गत असणारी 'आहार समिती' आणि दुसरी म्हणजे 'माता समिती'. मंडळी या तीनही समित्या फार महत्त्वाच्या आहेत. जर गावातील या तीनही समित्या बळकट असत्या तर आपल्या गावातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व बालकांचे आरोग्य चांगले राहण्यास हमखास मदत झाली असती. परंतु या समित्या काहीशा निष्क्रिय आहेत. आपल्या गावातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता आणि त्यांच्या बालकांचे आरोग्य बिघडलेले आपल्याला अजिबात आवडणार नाही... होय ना! म्हणूनच आपल्याला गावातील या तिन्ही समित्यातील काही सक्रिय सदस्य आणि गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांचा मिळून एक भक्कम असा 'गाव गट' तयार करायचा आहे. माता बाल आरोग्य अधिकार प्रक्रियेची सामुदायिक जबाबदारी 'गावगटा'वर असणार आहे. या गावगटाच्या माध्यमातून लाभार्थी गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना, माता बाल आरोग्य संबंधित आर्थिक लाभाच्या योजना व सेवांचा लाभ मिळवून द्यायचा आहे. त्यामुळे आपल्या गावातील गरोदर स्त्रिया व स्तनदा माता व त्यांच्या बालकांचे आरोग्य व पोषण चांगले होण्यास मोलाची भर पडणार आहे. गावगटाच्या पुढाकारामुळे आपल्या गावातील माता आरोग्य योजना व सेवांवर देखरेख वाढणार आहे.

**गावगट कोणाचा असावा ?**

माता बाल आरोग्य सेवा व आर्थिक लाभाच्या योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थी गरोदर

स्त्रिया व स्तनदा मातांचा या गावगटात सहभाग महत्त्वाचा आहे. कारण योजनांचा लाभ घेत असताना येणाऱ्या अडचणींबद्दल त्याच जास्त चांगल्या पद्धतीने स्वत:चे अनुभव मांडू शकतात. आणि त्यावर पर्यायही काढू शकतात असा आपला विश्वास आहे.

माता बाल आरोग्य सेवा व योजनांचा लाभ घेणाऱ्या सर्व लाभार्थी गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांच्या कुटुंबातील जबाबदार व्यक्ती या गावगटाचे सदस्य असतील. बऱ्याच वेळा योजनांचा लाभ मिळवून घेण्यासाठी कुटुंबातील जबाबदार व्यक्ती पुढाकार घेत असतात. आधार कार्ड, बँक, रेशन कार्ड अशी आणि इतर उपयोगी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी या जबाबदार व्यक्ती महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

आपल्या गावात गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता समिती, माता समिती, अमृत आहार समिती आहे. जरी या समित्या फारशा सक्रिय नसल्या तरी या समित्यांमधील काही सदस्य हे गावातील माता आणि बालकांचे आरोग्य सुरक्षित राहावे यासाठी गाव पातळीवर प्रयत्न करत असतात. शिवाय या लाभार्थी महिलांपैकी काही महिला ह्या माता समिती आणि अमृत आहार समितीच्या सदस्यही असतात. अशा सक्रिय सदस्यांना या गावगटात सामील करून घ्यायचे आहे. त्यामुळे गावातील आरोग्य सेवा व योजनांचा वापर सुरळीत होण्यास मदत होईल.

आपल्या गावातील महत्त्वाचा घटक असलेले ग्रामपंचायतीचे सक्रिय सदस्य, यातील काही सदस्य हे गाव आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता समितीचे सदस्यही असतात. त्यामुळे गावगटात ग्रामपंचायतचे सदस्य, सरपंच असल्यास आरोग्य सेवा व योजनांसंबंधित अडचणी सोडविण्यासाठी या सदस्यांचा निश्चितच उपयोग होऊ शकतो.

**गावगटाच्या जबाबदाऱ्या –**

गावगटाने दर महिन्याला गावगटाची बैठक घ्यायची आहे. या बैठकीत माता बाल आरोग्य सेवा व आर्थिक लाभाच्या योजनेचा (प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना, बुडीत मजुरी योजना, अमृत आहार योजना) लाभ घेताना येणाऱ्या अडचणी व त्रुटी शोधायच्या आहेत. त्या त्रुटींची पडताळणी करून त्या आरोग्य व ग्रामपंचायत कर्मचारी व अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यायच्या आहेत. या त्रुटी दूर करण्यासाठी आरोग्य व पंचायत कर्मचारी–अधिकारी यांच्या मदतीने प्रयत्न करायचे आहेत.

आपल्या गावात किती गरोदर व स्तनदा माता आहेत याची माहिती गावगटातील सदस्यांना माहिती असणे आवश्यक आहे. तसेच या महिलांना कोणकोणत्या योजनांचा व आरोग्य सेवेचा लाभ मिळाला आहे. कोणत्या योजनांचा व आरोग्य सेवेचा लाभ मिळाला नाही याबद्दल माहिती असावी. ही माहिती गावातील आशा, अंगणवाडी आणि नर्सताईकडून घ्यायची आहे.

अंगणवाडी, आशाताई, नर्सताई, आरोग्य केंद्र यांच्याकडे असलेल्या रजिस्टरमधील नोंदी तपासून लाभार्थ्यांसोबत त्याची पडताळणी अर्थात शहानिशा (सामाजिक अंकेक्षण) दर महिन्याला करायची आहे.

माता बाल आरोग्य सेवा व योजना कुठे व कोणामार्फत मिळतात, त्या मिळवण्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात, त्या कागदपत्रांची पूर्तता कशी करायची याबाबत गावगटाने जाणीवजागृती करायची आहे.

अंगणवाडीला भेट देऊन गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना मिळणारा अमृत आहार व्यवस्थित मिळतो की नाही ते तपासणे, त्याबद्दल काही अडचणी असतील तर त्या सोडवण्यासाठी अंगणवाडी पातळीवर प्रयत्न करणे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अमृत आहार योजनेबाबत जनजागृती करणे. त्यामुळे अमृत आहार योजनेअंतर्गत गरोदर व स्तनदा माता व बालकाच्या नोंदणीचं व आहार घेण्याचं प्रमाण वाढण्यास मदत होईल.

दर महिन्याला अंगणवाडीत, आशाताईंकडे गरोदर स्त्रियांची नोंद होते की नाही, त्यांना माता बाल संगोपन कार्ड मिळाले की नाही, माता बाल संगोपन कार्डावर सर्व नोंदी व्यवस्थित होतात की नाही यावर गावगटाने देखरेख ठेवायची आहे.

जर एखाद्या गरोदर स्त्रीची नोंदणी चुकून राहिली असेल तर तिची ताबडतोब नोंदणी करून घेण्यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी नोंदणी रजिस्टरमधील सर्व माहिती पडताळून पाहणे गरजेचे आहे.

गावातील गरोदर स्त्रियांना आरोग्य विभागाकडून माता बाल संगोपन (MCP) कार्ड मिळाले का? त्यांची रक्त तपासणी (HB), लघवी तपासणी, वजन, उंची, पोटावरून तपासणी, एच.आय.व्ही. तपासणी, सोनोग्राफी तपासणी, स्त्रीरोगतज्ज्ञामार्फत तपासणी झाली का? गरोदरपणात रक्तवाढीसाठी लाल गोळ्या दिल्या का? या गोष्टींवर गावगटाने लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

गावातील सर्व जोखमीच्या मातांची नोंद आरोग्य सेविकेच्या रजिस्टरवर केली जाते की नाही यावर लक्ष ठेवणे. त्यानुसार दर महिन्याला जोखमीच्या मातांची यादी तपासणे. आशाताईंमार्फत जोखमीच्या मातांचा पाठपुरावा होतो की नाही, त्यांना विशेष सेवा व सल्ला मिळतो का? याचा आढावा दर महिन्याला घेणे. जोखमीच्या मातांना गरज असल्यास आशाताईंच्या मदतीने तज्ज्ञ डॉक्टरकडे नेण्याची/तपासण्यांची सोय करायची आहे.

बाळंतपणात दवाखान्यात जाण्यासाठी व बाळंतपणात दवाखान्यातून घरी येण्यासाठी सरकारी गाडी मिळाली का? बाळंतपणाच्या वेळी दवाखान्यात राहण्याची सोय कशी होती? प्रसूतीच्या वेळी महिलेला मोफत जेवण मिळाले का? अशा गोष्टी गावगटाच्या बैठकीत चर्चा करणे व त्यासाठी गाव गटामार्फत आरोग्य केंद्राशी संवाद साधणे आवश्यक आहे.

आरोग्य सेवा व योजनांच्या (प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना, बुडीत मजुरी योजना, अमृत आहार योजना) संदर्भात गावातील लोकांकडून उपस्थित झालेल्या मुद्यावर आशाताई, अंगणवाडी ताई, नर्सताई, ग्रामपंचायत व संबंधित अधिकारी यांच्यासोबत चर्चा करणे. त्यातून उपस्थित मुद्दे सोडवण्याचा प्रयत्न करणे.

गावगटाने प्रत्येक मासिक बैठकीत त्यांच्याकडे असलेल्या यादीप्रमाणे प्रत्येक लाभार्थी

महिलेची सविस्तर माहिती घ्यायची आहे. उदा. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, मातृत्व अनुदान योजना, बुडीत योजने अंतर्गत लाभार्थी असेल तर प्रत्यक्षात किती हप्त्यांचे पैसे मिळाले, किती पैसे मिळाले, पासबुकाची नोंद पाहणे, गरोदर स्त्री असेल तर तिच्या कोणकोणत्या तपासण्या झाल्या या गोष्टी पाहायच्या आहेत.

जे प्रश्न गाव पातळीवर सुटू शकत नाही ते प्रश्न प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर व गरज भासल्यास तालुका स्तरावर सोडविण्यासाठी रुग्ण कल्याण समिती, नवसंजीवनी समिती सदस्यांमार्फत सोडविण्यासाठी प्रयत्न करणे. यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्याची गावगटाला मदत घेता येईल.

संस्थेमार्फत आयोजित प्रा. आ. कें. व तालुका स्तरावरील संवाद कार्यक्रमामध्ये गावगट सदस्यांनी उपस्थित राहून आपल्या गावातील माता व बाल आरोग्य सेवेविषयी असणारे प्रश्न मांडणे आवश्यक आहे.

गावगटाकडे गावात येणाऱ्या सर्व आरोग्य व पोषण कर्मचाऱ्यांचे संपर्क क्रमांक असणे आवश्यक आहे. जेणेकरून तातडीच्या वेळी तत्काळ संपर्क साधता येईल आणि पाठपुरावा करता येईल. (संस्था कार्यकर्त्याने गावगटाला हे क्रमांक मिळवून द्यावेत. ते अंगणवाडी व ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, समाज मंदिर आदी दर्शनीय ठिकाणी लावावेत. शिवाय प्रत्येक गट सदस्याकडे व संबंधित कुटुंबाकडे या संपर्क क्रमांकांची यादी द्यावी.)

# गरोदर व स्तनदा महिलांसाठी असलेल्या योजनांची माहिती

## प्रधानमंत्री मातृ वंदना अनुदान योजना

**उद्देश –**

- ८ डिसेंबर २०१७ पासून महाराष्ट्रात मातृत्व वंदन योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून, स्त्री गरोदर राहिल्यावर तिची लवकरात लवकर नोंदणी करणे आणि तिची नियमित आरोग्य तपासणी करणे. तसेच काम करणाऱ्या महिलांच्या मजुरीची नुकसान भरपाई व्हावी. गरोदर महिला आणि स्तनपान करणाऱ्या मातांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी. कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर स्त्री व स्तनदा मातांना योग्य पोषण आहार मिळावा. गरोदरपणात व बाळंतपणानंतर त्यांना विश्रांती मिळावी या उद्देशाने ही योजना राबवली जाते.
- ही योजना दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील सर्व गरोदर महिलांना पहिल्या बाळंतपणासाठी जिवंत बाळापुरती लागू आहे. काही कारणाने गर्भपात झाला किंवा मेलेलं बाळ जन्माला आले तर त्या टप्प्यापुरताच लाभ या योजनेतून मिळतो. (राज्य व केंद्र शासन अंतर्गत असलेले कर्मचारी आणि पगारासोबत मातृत्व रजेचा लाभ घेत असलेल्या महिलांना योजनेअंतर्गत लाभ मिळत नाही.)

**योजनेचा लाभ कसा मिळतो –**

ही योजना महिलांना तीन टप्प्यात मिळते...

- **पहिला हप्ता** १००० रुपयाचा असतो. मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून १५० दिवसात गर्भधारणा नोदणी केल्यानंतर लाभार्थी महिलेच्या खात्यात जमा केला जातो.
- **दुसरा हप्ता** २००० रुपयाचा असतो. गरोदरपणाचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर प्रसूतीपूर्व तपासणी केल्यानंतर महिलेच्या खात्यात जमा केला जातो.
- **तिसरा हप्ता** २००० रुपयाचा असतो. बाळाच्या जन्मानंतर बाळाचे बीसीजी, ओपीव्ही, डीटीपी आणि हिपेटायटीस बी लसीकरण झाल्यानंतर महिलेच्या खात्यात जमा केला जातो.

**योजना मिळवण्यासाठी पाठपुरावा–**

- या योजनेच्या लाभासाठी पती व पत्नी दोघांचे संमती पत्र, आधार संबंधित माहिती, लाभार्थी महिलेचे आधार संलग्न बँक खाते किंवा पोस्ट खाते, तिचा किंवा पतीचा मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
- **ग्रामीण भागात–** नर्सताई, आशा कार्यकर्ती योजनेस पात्र महिलेचा अर्ज मोफत भरून देतात आणि आवश्यक कागदपत्र जमा करून घेतात. तो अर्ज तालुका अधिकाऱ्याकडे सादर करण्याची जबाबदारी ही नर्सताईची असते.
- योजनेचा अर्ज प्रा.आ.केंद्र स्तरावरून योजनेच्या मुख्य पोर्टलवर ऑनलाईन जमा केला जातो. त्या अर्जाला तालुका वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा वैद्यकीय अधिकारी ऑनलाइन मान्यता देतात.
- त्यानंतर राज्य स्तरावरून लाभार्थी यादीला मान्यता दिली जाते. संबंधित रक्कम लाभार्थी महिलेच्या खात्यावर जमा केली जाते.
- अर्ज भरल्यानंतर साधारण महिनाभरात रक्कम बँक खात्यावर जमा होणे अपेक्षित आहे. तसे झाले नाही तर संबंधित प्रा. आ. केंद्र वैद्यकीय अधिकारी किंवा तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत पाठपुरावा करावा.
- जर गरोदर महिलेचे आधार कार्ड अपडेट नसेल, ते माहेरच्या नावाने असेल तर ते अपडेट करण्यासाठी पोस्ट ऑफिस किंवा आधार सेतूमध्ये जावे. तिथे लग्नाची पत्रिका किंवा पतीचे आधार कार्ड जोडून अपडेट करून आधार कार्ड अपडेट करून घ्यावे.
- महिलेचे बँक खाते व आधारकार्ड यांच्यावरील नाव एकच आहे याची खात्री करून घ्यावी. बऱ्याच वेळा योजनेचे पैसे हे माहेरचे नाव असलेल्या बँक खात्यावर जमा होतात.
- महिलांनी जे कागदपत्र नर्सताई, आशा व अंगणवाडी सेविकेला दिले आहेत, ते त्यांनी ऑनलाईन जमा केले की नाही याची खात्री करून घ्यावी.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे –**

- राष्ट्रीयकृत बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स प्रत
- लाभार्थी महिलेचे आधारकार्ड
- रहिवासी दाखला
- महिलेचा फोटो
- माता आणि बाल संरक्षण कार्ड/प्रसूती कार्ड

# जननी सुरक्षा योजना

▪**उद्देश–** राज्यातील सर्व ग्रामीण, आदिवासी भागातील अनुसूचित जाती व जमातीतील तसेच दारिद्र्य रेषेखालील सर्व गर्भवती महिलांना सुरक्षित संस्थात्मक प्रसूतीसाठी योजनेचा लाभ देण्यात येतो. २००६ पासून 'जननी सुरक्षा योजना' राबविली जाते.

**योजनेचा लाभ–**

- संस्थात्मक नियमित बाळंतपणासाठी ७०० रुपये मिळतात.
- घरी बाळंतपण झाल्यास ५०० रुपये मिळतात.
- सिझेरियन झाल्यास १५०० रुपये मिळतात.
- हा लाभ प्रसूतीनंतर ७ दिवसाच्या आत, थेट लाभ आधार कार्ड संलग्न बँक खात्यात जमा केला जाणे अपेक्षित आहे.

**योजना मिळवण्यासाठी पाठपुरावा–**

- प्रसूतीच्या वेळी दवाखान्यात जाताना वर सांगितलेली कागदपत्र घेऊन गेल्यास योजनेचा लाभ मिळण्यात अडचण येणार नाही.
- प्रसूती झालेल्या दवाखान्यातील नर्सताई किंवा आशाताई संबंधित कागदपत्र लाभार्थी महिलेकडे मागतील आणि योजनेसाठी अर्ज भरून घेतील.
- या योजनेचा लाभ ज्या दवाखान्यात प्रसूती झाली त्या दवाखान्याच्या प्रमुख अधिकारी/अधिक्षक यांच्यामार्फत मिळत असतो, त्यामुळे अर्ज भरल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची मंजुरी घेऊन योजनेच्या लाभाची रक्कम महिलेच्या खात्यावर जमा केली जाते.
- योजनेचा लाभ मिळाला नसल्यास आशाताई, दवाखान्यातील नर्स/क्लार्क/ वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे –**

- राष्ट्रीयकृत बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स प्रत
- लाभार्थी महिलेचे आधारकार्ड
- रहिवासी दाखला
- महिलेचा फोटो
- माता आणि बाल संरक्षण कार्ड/प्रसूती कार्ड

# नवसंजीवनी योजने अंतर्गत 'मातृत्व अनुदान योजना'

**उद्देश–** आदिवासी क्षेत्रातील गरोदरपणाची लवकर नोंदणी आणि मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी, त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा तसेच गरोदरपणात व नंतर विश्रांती मिळावी या उद्देशाने शासनाने 'मातृत्व अनुदान योजना' १९९७ –९८ पासून मंजूर केलेली आहे.

**योजनेच्या अटी व पात्रता –**

■ आदिवासी आणि अनुसूचित जाती, जमातीतील सर्व महिला ■ सरकारी आणि गैर–सरकारी आरोग्यसंस्थामध्ये संस्थात्मक प्रसूती झालेल्या महिला. ■ तीन जिवंत अपत्ये (२ जिवंत अपत्ये व सध्या गरोदर) असणाऱ्या महिला.

**योजनेचा लाभ–**

■ गरोदरपणात ४००रु. रोखीने ■ गरोदरपणात ४०० रु.ची औषधे

**योजना मिळवण्यासाठी पाठपुरावा–**

- आशाताई/नर्सबाई योजनेचा अर्ज भरून घेईल आणि आवश्यक कागदपत्र जमा करून घेईल.
- योजनेचा अर्ज प्रा. आ. कें. स्तरावरून तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे जमा केला जाईल.
- तालुका वैद्यकीय अधिकारी तालुक्यातील सर्व महिलांची यादी एकत्र करून जिल्हा वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे निधीची (ऑनलाईन) मागणी करतात.
- त्यानंतर लाभार्थी यादीला जिल्हा स्तरावरून मान्यता मिळून संबंधित रक्कम तालुका वैद्यकीय अधिकारी यांना मिळते, त्यानुसार दर महिन्याच्या लाभार्थी महिलांच्या यादीनुसार त्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा केली जाते.
- अर्ज भरल्यानंतर साधारण महिना ते दोन महिन्याच्या आत रक्कम बँक खात्यावर जमा होणे अपेक्षित आहे. तसे झाले नाही तर संबंधित प्रा. आ. कें. वैद्यकीय अधिकारी किंवा तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत पाठपुरावा करावा.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे –**

- राष्ट्रीयकृत बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स प्रत
- लाभार्थी महिलेचे आधारकार्ड
- रहिवासी दाखला
- महिलेचा फोटो
- माता आणि बाल संरक्षण कार्ड/प्रसूती कार्ड

# मानवविकास योजने अंतर्गत 'बुडीत मजुरी योजना'

**उद्देश –** बाळंतपणात महिलांना आराम करणे आवश्यक आहे, अनुसूचित जाती–जमातीच्या आणि आदिवासी भागातील महिलांना बाळंतपणानंतर ताबडतोब कामावर जावे लागू नये व या काळात बाळाची विशेष काळजी घेतली जावी म्हणून लागू केलेली योजना.

**योजनेच्या अटी व पात्रता –**

- मानव विकास मिशन अंतर्गत तालुक्यातील आदिवासी आणि अनुसूचित जाती, जमातीतील सर्व महिला.
- दुसऱ्या व त्या पुढील खेपेच्या गरोदर महिलांना योजनेचा लाभ दिला जाईल.

**योजनेचा लाभ –**

- गरोदरपणाच्या नवव्या महिन्यात २००० रु.
- बाळंतपणानंतर २००० रु.

**योजना मिळवण्यासाठी पाठपुरावा–**

- आशाताई/नर्सबाई गरोदर महिलेकडून योजनेचा अर्ज भरून घेईल आणि आवश्यक कागदपत्र जमा करून घेईल.
- योजनेचा अर्ज प्रा. आ. कें. स्तरावरून तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे जमा केला जाईल.
- तालुका वैद्यकीय अधिकारी तालुक्यातील या योजनेतील सर्व महिलांची यादी एकत्र करून जिल्हा स्तरावर पाठवतात, मा. जिल्हाधिकारी या महिलांच्या यादीला (ऑनलाइन) मान्यता देतात.
- त्यानंतर लाभार्थी यादीला जिल्हा स्तरावरून मान्यता मिळून तालुकानिहाय यादीनुसार संबंधित रक्कम तालुका वैद्यकीय अधिकारी यांना मिळते, तालुका वैद्यकीय अधिकारी यादीनुसार लाभार्थी महिलांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा करतात.
- जिल्ह्यातील महिलांच्या यादीच्या मान्यतेनुसार आणि निधीच्या उपलब्धतेनुसार प्रा. आ. कें/तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत बँक खात्यावर जमा होणे अपेक्षित आहे. तसे झाले नाही तर संबंधित प्रा. आ. कें. वैद्यकीय अधिकारी किंवा तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत पाठपुरावा करावा.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे –**

- राष्ट्रीयकृत बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स प्रत
- लाभार्थी महिलेचे आधारकार्ड
- रहिवासी दाखला
- महिलेचा फोटो
- माता आणि बाल संरक्षण कार्ड/प्रसूती कार्ड

Support for Advocacy & Training to Health Initiatives
साथी

**प्रकाशक– साथी** (Support for Advocacy & Training to Health Initiatives)
अमन ई टेरेस, प्लॉट नं. १४०, डहाणूकर कॉलनी, कोथरूड,
पुणे–४११०२९; फोन– (०२०) २५४५२३२५
मुद्रण – एन.आर.एंटरप्रायझेस, ऑक्टोबर, २०२१